# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक ३० जून, २०२२ / आषाढ ९, १९४४ (शके)

### लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**८५.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन गुरुवार, दिनांक ०३ मार्च, २०२२ रोजी सुरु होऊन शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण १९४ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ३८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण १५६ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ६६ लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली असून ९० प्रलंबित निवेदनांपैकी २२ निवेदने गुरुवार, दिनांक १२ मे, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. प्रलंबित ६८ निवेदनांपैकी १४ निवेदने गुरुवार, दिनांक २ जून, २०२२ रोजीच्या पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आली आहेत. आता एकूण प्रलंबित ५४ निवेदनांपैकी १२ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ३० जून, २०२२**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

<u>याची प्रत</u> :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

\\MLS-DATASERVER\BM Branch\...PC data\Bul Part 2\BULL PART YEAR 2022.docx

लक्षवेधी सुचना क्रमांक : ५२४ गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्री. प्रमोद पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५२४ पुढीलप्रमाणे आहे :-**

"कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील मोकाशी पाडा, दहिसर, दहिसर मोरी या तीन गावातील जबरदस्तीने जमीन लाटण्याच्या उद्देशाने दिनांक ३ फेब्रुवारी, २०२२ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे माजी नगरसेवक रमेश सुकऱ्या म्हात्रे, वैभव पाटील, सचिन पाटील व त्यांचे चाळीसहून अधिक गुंड साथीदार लाठ्याकाठ्यानिशी ४ गाड्यांतून येऊन मोकाशी पाडा येथील एकनाथ मोकाशी व त्यांचा मुलगा प्रशांत मोकाशी यांना बेदम मारहाण करून व महिलांनाही धक्काबुक्की करून दहशत निर्माण करणे, याप्रकरणी डायघर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविण्यास गेले असताना स्थानिक पोलिसांकडून गुन्हा नोंदविण्यासंदर्भात कोणतीही कारवाई न झाल्याने स्थानिक विधानसभा सदस्यांनी पीडित एकनाथ मोकाशी व त्यांचे कुटुंब तसेच दहशतीखाली असलेल्या अन्य शेतकऱ्यांसह डायघर पोलिस स्टेशनवरच ठिय्या आंदोलन केल्यानंतर चार दिवसानंतर पोलीसांनी कडोंमपाचे माजी नगरसेवक रमेश सुकऱ्या पाटील, वैभव पाटील, सचिन पाटील व १५ गुन्हेगारांविरुद्ध एफ.आय.आर. नोंदविणे, पोलिसांकडून एफ.आय.आर. मध्ये झालेल्या अक्षम्य दिरंगाईबाबत सखोल चौकशी करून संबंधित दोषी विरोधात कायदेशीर तसेच गुन्हेगारांविरोधात कडक कारवाई होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री (गृह) यांचे निवेदन

मोकाशी पाडा, दहिसर, दहिसर मोरी या तीन गावांची पिपरी गाव दहिसर ता.जि.ठाणे येथे एकूण २८४ एकर जमीन असून त्या जमिनीचा ७/१२ उतारा हा पंच कमिटीच्या नावाने आहे. सदर जमिनीच्या विक्रीसंदर्भात पंच कमिटीच्या सदस्यांमध्ये एकमत नसल्याने त्यांच्यामध्ये वाद निर्माण झाला.

दि. ०३ फेब्रुवारी, २०२२ रोजी पंच कमिटीच्या मिटींगच्यावेळी श्री. रमेश म्हात्रे यांनी त्यांच्या सोबत १० ते १५ मंडळी जमवून शिवीगाळ करून धमकी दिली. त्यावेळी श्री. रमेश म्हात्रे यांचे सोबत असलेले, श्री. सचिन रघुनाथ पाटील, श्री. वैभव हरीशचंद पाटील व इतर यांनी श्री. एकनाथ मोकाशी यांना तसेच त्यांचा मुलगा प्रशांत यांना शिवीगाळी व दमदाटी करुन मारहाण केली व श्री. प्रशांत मोकाशी यांच्या डोक्यात मारहाण करून गंभीर दुखापत केली. ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत शिळ डायघर पोलीस ठाणे हद्दीतील सदरची घटना घडल्यानंतर दोन्ही पक्ष हे एकमेकांविरुद्ध तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात आले होते. तथापि, फिर्यादी यांना

औषधोपचाराची आवश्यकता असल्याने त्यांना मेडीकल मेमो देऊन छत्रपती शिवाजी हॉस्पीटल, कळवा येथे औषधोपचाराकरिता पाठविण्यात आले. परंतु, औषधोपचारानंतर त्या दिवशी फिर्यादी हे पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास परत आले नाहीत. घटनेच्या दुसऱ्या दिवशी दि.०४ फेब्रुवारी, २०२२ रोजी फिर्यादी हे कल्याण ग्रामीण मतदार संघाचे विद्यमान विधानसभा सदस्य यांचेसह पोलीस ठाण्यात आले तेव्हा पोलीसांनी त्यांना सदर घटनेच्या अनुषंगाने जबाब देण्याची विनंती केली असता, त्यांनी सदर गुन्हयात प्रथमतः आरोपींना अटक करण्याची मागणी केली व त्यांनी पोलीस ठाण्यात घटनेबाबत जबाब देण्यास नकार दिला.

सदर घटनेची सखोल चौकशी करून दि. ०८ फेब्रुवारी, २०२२ रोजी शिळ डायघर पोलीस ठाणे, ठाणे शहर येथे गु. र. क्र. ४२/२०२२, भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२६, ५०४, ५०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपींना मा. न्यायालयाने दिनांक २२/०२/२०२२ रोजी जामीन मंजूर झाला असून सदर प्रकरणाचा पुढील तपास चालू आहे.

**********

## लक्षवेधी सूचना

सर्वश्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. हिरामण खोसकर, संग्राम थोपटे, कुणाल पाटील, झीशान सिद्दिकी, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. धिरज देशमुख, सुरेश वरपुडकर, विकास ठाकरे, अमित झनक, लहू कानडे, सुभाष धोटे, विक्रमसिंह सावंत, बळवंत वानखडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई उपनगर जिल्हयातील तहसिल कार्यालयामार्फत मागील कालावधीत सर्वसामान्य नागरिक, सहकारी गृहनिर्माण संस्था, अन्य वेगवेगळया संस्थांना सन १९९६ पासून सन २०२१ पर्यंत अश्या एकुण २५ वर्षाच्या कालावधीच्या एकत्रित अकृषिक आकारणीच्या नोटीसा देण्यात येणे. सदर नोटिसामध्ये सन १९९६ पासून अकृषिक आकारणीची थकबाकी नमूद केलेली असणे. सदर नोटीशीमधी ल बिनशेती-सारा / अकृषिक आकारणीचे प्रमाणदर अवाजवी असणे. सन १९९६ ते २०२१ दरम्यान अनेक सर्वसामान्य नागरीकांनी, सोसायटयांनी यापूर्वी वेळोवेळी अकृषिक आकारणीचे पैसे भरुन देखील पूर्वी भरलेल्या पैशांच्या नोंदी संबंधित नोटीसीमध्ये नसणे. मागील काळात झालेली नोटबंदी, कोविड १९ च्या महामारी साथीमुळे सर्व क्षेत्रातील लोकांच्या झालेल्या पगार कपातीच्या, आर्थिक अडचणींच्या काळात नागरीकांना, त्यांच्या सोसायटयांना अवाजवी रकमेच्या नोटीसा येणे. सदर रक्कम भरण्यासाठी सात दिवसाचा अल्पावधी देणे. सदर रक्कम न भरल्यास संबंधित नागरीक आणि सोसायटयांची बँक खाती किंवा सोसायटी कार्यालय सील करण्याच्या धमक्या देणे. याशिवाय विविध आस्थापना कोविड-१९ पार्श्वभूमीवर आर्थिक अडचणीत असताना देखील अश्या प्रकारे नोटीसा देणे, परिणामी त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या पगाराचे प्रश्न उपस्थित होणे, राज्याच्या अन्य महानगर पालिका क्षेत्रात देखील अश्याच प्रकारच्या तक्रारी प्राप्त होणे. राज्यातील महापालिका, नगरपालिका क्षेत्रात त्यांच्याकडून शीघ्रसिध्दगणकाच्या आधारे संबंधित नागरीक, सोसायटया, विविध आस्थापना यांना मालमत्ता कराची आकारणी करणे. महापालिका क्षेत्रात मालमत्ता कर व अकृषिक कर अशा दुहेरी आकारणीमुळे लोकांवर पडणारा आर्थिक भुर्दंड, कोविड १९ च्या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य नागरीक, व्यावसायिक अडचणीच्या काळातून जात असताना, त्यांना शासनाकडून मदतीची अपेक्षा असताना शासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे सर्वसामान्य लोकांच्या मनात तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, परिणामी होणारी आर्थिक छळवणूक,स्थानिक नागरीकावर होत असलेला अन्याय, त्यामुळे शासनाने केलेली वा करावयाची उपाय योजना अथवा शासनाने यावर करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

*****

## मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४५, ४२ तसेच कलम १०९ ते ११४ मधील तरतुदीनुसार अकृषिक वापर करण्यात येणा-या जमिनीच्या संदर्भात अकृषिक आकारणी करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. याकरिता महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम १९६९ मध्ये तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त तरतुदींनुसार अकृषिक वापरासाठी नागरी तसेच ग्रामीण भागाचे दर ठरविणे, सदर दरांचा हमी कालावधी ठरविणे, अकृषिक दर निश्चित करताना सदर दर निश्चित करण्याची कार्यपद्धतीचा उल्लेख उपरोक्त कलम व नियमांत करण्यात आलेला आहे. तथापि, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मध्ये मुंबई शहर जिल्ह्याकरिता स्वतंत्र प्रकरण असून त्याअंतर्गत प्रतीवर्षी भुईभाडयाची आकारणी करण्यात येते.

सदर तरतूदीनुसार राज्यात दिनांक ०१/०८/१९७९ ते दिनांक ३१/०७/१९९१ या १० वर्षाच्या हमीकरिता १९७९ च्या बाजारमुल्याच्या आधारे आकारणीचे प्रति चौ.मी. दर निश्चित करण्यात आले होते व सदर आकारणीचे दर सन १९९१ पर्यन्त अस्तित्वात होते. कालांतराने अकृषिक दराची आकारणी जमिनीच्या बाजारमुल्यांच्या प्रथमत: ३ टक्के करण्यात आली. तथापि लोकांच्या विरोधानंतर सदर आकारणी १.५

टक्क्यापर्यन्त कमी करण्यात आली. तरी सुध्दा लोकांच्या तक्रारी प्राप्त झाल्याने प्रथमत: सप्टेंबर २००६ मध्ये तत्कालिन मा. मंत्री (महसूल) यांनी स्थगिती देऊन १९९१ च्या दराप्रमाणे २००८ पर्यन्त अकृषिक आकारणीस मुदतवाढ दिली होती. म्हणजेच सन १९९१ च्या दराप्रमाणे सन २००८ पर्यन्त अकृषिक आकारणी लागू होती व त्याप्रमाणे अकृषिक आकारणी वसूल करण्यात आली होती. सदर दरात कपात करुन हा अकृषिक आकारणीचा दर जमिनीच्या बाजारमुल्याच्या ०.०५ टक्के करण्यात आला. तथापि, यास देखील लोकांचा विरोध झाल्याने तत्कालिन मा. मंत्री (महसूल) यांच्याकडे बैठक होऊन एप्रिल २०१० मध्ये सन २००६ ते २०११ या हमी कालावधीकरिता वाढीव दराने अकृषिक आकारणी करण्यास स्थगिती दिली. तद्नंतर दि. २४ ऑगस्ट, २०११ रोजी सदर स्थगिती कायम करुन सन २०११ ते २०१६ या हमी कालावधीकरिता देखील पुर्वीच्या दराप्रमाणे आकारणी करण्याच्या सूचना निर्गमित केल्या. तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांच्या दि. २४ ऑगस्ट, २०११ च्या आदेशाप्रमाणे सन २०१७-१८ पर्यंत सन १९९१ च्या दराप्रमाणे सदरची वसुली सुरू होती. सप्टेंबर २०१७ मध्ये शासनाने महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रूपांतरण व अकृषिक आकारणी) नियम, १९६९ च्या नियम १५ मध्ये जमिनीचे बाजारमुल्य निश्चित करताना शिघ्रसिध्दगणकानुसार जमिनीची किंमत विचारात घेण्याबाबत देखील तरतूद करण्यात आली. व सदर दर जमिनीच्या बाजारमुल्याच्या ०.०५ टक्के निश्चित करण्यात आला. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ११३ च्या पोट कलम २ (क) मध्ये सुधारणा केली व हमी कालावधी ५ वर्ष करण्यात आला. तसेच हमी कालावधीसाठी दर निश्चित करताना लगत पूर्वीच्या शिघ्रसिध्दगणकानुसार बाजारमूल्य निश्चित करण्याबाबत तरतूद करण्यात आली.

कायद्यातील व नियमातील उक्त सुधारणेनंतर, अकृषिक वसूलीत दिलेली स्थगिती उठवण्याबाबत व सुधारित अकृषिक प्रमाणदराच्या आधारे, अकृषिक आकारणी करुन ती वसूल करण्या संदर्भात दिशानिर्देश निर्गमित करण्याबाबतचे शासन परिपत्रक शासनाने दिनांक ५ फेब्रुवारी २०१८ रोजी निर्गमित केले. सदर निर्णयानुसार, साधारणपणे सन २००१ ते २००६ / २००६ ते २०११ / २०११ ते २०१६ / २०१६ ते २०२१ या हमी कालावधीत कशाप्रकारे अकृषिक दर निश्चित करुन बिनशेती सा-याची रक्कम आकारणी करावी, याबाबत क्षेत्रीय अधिका-यांना मार्गदर्शन करुन वसूल करण्याच्या अनुषंगाने सूचना देण्यात आल्या आहेत. तद्नंतर परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी अकृषिक दराची निश्चिती केली. दर निश्चिती नंतर क्षेत्रीय अधिका-यांनी मिळकत निहाय अकृषिक कराच्या थकबाकीची रक्कम व सन २०२१-२२ या नियमित वर्षाची अकृषिक कराची आकारणी करुन रक्कम वसूल करण्याकरिता नोटीसा निर्गमित केल्या, ही वस्तुस्थिती आहे.

अकृषिक कर हा जमिनीवरील मुलभूत कर असून तो राज्याचा उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत आहे. अकृषिक कराची आकारणी ही कायदा व नियमातील तरतुदीनुसार, राज्य शासनाने अधिनियम क्रमांक ५४, सन २०१७ मधील सुधारित तरतुदीनुसार व दिनांक ५ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या दिशानिर्देशानुसार करण्यात आलेली आहे.

तथापि, दिनांक २२ मार्च, २०२२ रोजी विधानसभेत या विषयासंदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन परिपत्रकातील दिशानिर्देशानुसार वसूल करण्यात येणाऱ्या अकृषिक कराच्या वसुलीच्या कार्यवाहीस पुढील निर्णय होईपावेतो तात्पुरती स्थगिती देण्यात येत असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

*****

## लक्षवेधी सूचना

श्री. झीशान सिद्दिकी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबईतील वांद्रे पूर्व येथील रामनगर, गरीब नगर, नौपाडा, घास बाजार, तीन बंगला, बापूची स्टॉल रोड येथील एकशे चार एकर जागेवर ८० वर्षापासून वसाहती वसल्या असून सुमारे दहा हजार कुटुंबे असलेल्या या वस्त्यांमधील बहुतांशी कुटुंबाकडे वास्तवाची सर्व पुरावे असणे, रेल्वे लगत असलेल्या कुटुंबांना संरक्षण देण्याची राज्य शासन कार्यवाही करणार असल्याचे माहिती २०२२ च्या दरम्यान जाहीर करणे, येथील रहिवासी यांच्याकडे जुने रेशनिंग कार्ड, वीजबिल, पाणी पुरवठा जोडणी देयके इत्यादी पुरावे असून अनेक वर्षांपासून या ठिकाणी राहणाऱ्या रहिवाशांची घरे मोडकळीस आलेली असल्याने कधी दुर्घटना होऊन जीवितहानी होण्याची शक्यता असणे, सदरच्या २०४ एकर जमिनीपैकी १७७ एकर जमिनीची प्रॉपर्टी कार्ड रेल्वेच्या नावे असून रेल्वे मंत्रालयाकडे ताबा असणे, परंतु ७७ एकर जमिनी संदर्भात राज्य शासनाने कोणती ताबा पत्र दिले नसल्याने उक्त ७७ एकर जमीन राज्य शासनाने प्रॉपर्टी कार्ड करून बेहराम नगर, गरीब नगर, नौपाडा, घास बाजार, तीन बंगला, बापूची स्टॉल रोड येथील रहिवाशांचे पुर्नविकास करणे शक्य असतानाही उक्त ७७ एकर जमीन प्रॉपर्टी कार्ड तयार करुन ताबा घेण्यास शासनाकडून विलंब होत असल्याने स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन सदरचे ७७ एकर जमिनीचा ताबा घेऊन उक्त वसाहतींचा पुर्नविकास करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक ११/११/२०१३ रोजीच्या आदेशानुसार नगर भूमापन अधिकारी, बांद्रा यांनी न.भू.क्र.६७६ क्षेत्र २३९१२ चौ.मी., न.भू.क्र.६७७ क्षेत्र ६०४६९४.०८ चौ.मी. व न.भू.क्र.६७८ क्षेत्र १९९३६४ चौ.मी. या मिळकतपत्रिका रेल्वे प्रशासनाच्या नावाने उघडल्या आहेत व न.भू.क्र.६७९ क्षेत्र २०६९.० चौ.मी. ही मिळकत पत्रिका महाराष्ट्र शासनाच्या नावाने उघडण्यात आलेली आहे.

मौजे वांद्रे (पूर्व) येथील रामनगर, गरीब नगर, नौपाडा, घास बाजार, तीन बंगला, बापूची स्टॉल रोड येथील वसाहती हया मौजे वांद्रे पूर्व येथील न.भू.क्र.६७६ क्षेत्र २३९१२ चौ.मी. (सुमारे ६ एकर),न.भू.क्र. ६७७ क्षेत्र ६०४६९४.०८ चौ.मी. (सुमारे १४९ एकर) व न.भू.क्र. ६७८ क्षेत्र १९९३६४ चौ.मी.(सुमारे ४९ एकर) या मिळकतीमध्ये वसलेल्या आहेत. सदर मिळकतीचे एकुण क्षेत्र सुमारे ८,२७,९७०.०८ चौ.मी. (सुमारे २०४ एकर) आहे.

विषयांकित जमिनीबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर, अपर आयुक्त, कोकण विभाग यांनी वेळोवेळी अर्धन्यायिक आदेश पारीत केलेले आहेत व त्यानुसार सदर जमिनीची मालकी पश्चिम रेल्वेची ठरलेली आहे. त्यामुळे पश्चिम रेल्वेच्या मालकीच्या सुमारे २०४ एकर जमिनीपैकी ७७ एकर जमिनीचे प्रॉपर्टी कार्ड राज्य शासनाच्या नांवे करुन सदर जमिनीचा ताबा राज्य शासनाकडे घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

*****

**श्री.सुरेश भोळे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

" जि. नाशिक, दिंडोरी व पेठ तालुक्यातील विविध योजनांच्या विकासकामांच्या प्रशासकीय मंजुरीच्या फाईली, जिल्हा परिषद बांधकाम विभाग एकचे कार्यकारी अभियंता श्री.सुरेंद्र कंकरेज व तीनच्या कार्यकारी अभियंता श्रीमती शैलजा नलावडे यांनी जास्तीची टक्केवारी न मिळाल्याने अडवून ठेवल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, सदर एक व तीन चे कार्यकारी अभियंता कार्यालयात न भेटणे, कार्यालयात न येणे, लोकप्रतिनिधींचे मोबाईल कॉल न घेणे, विकास कामांच्या फाईल प्रशासकीय मान्यता देऊन विकासकामे सुरु करण्यासाठी पुढे न पाठविणे, पंचायत समिती कार्यालयात बसुन कामकाज करणे, जे ठेकेदार टक्केवारी देत नाही त्यांच्या फाईल्स हेतूपूवर्क थांबवून ठेवणे, यामुळे त्याचा दिंडोरी व पेठ तालुक्यातील व नाशिक जिल्हयातील विकासकामांवर झालेला अनिष्ट परिणाम, यामुळे येथील जनतेस विकासकामांपासून वंचित रहावे लागणे , श्री. सुरेंद्र कंकरेज हे गेली १५ ते २० वर्षापासून नाशिक येथेच कार्यरत असणे, त्यामुळे त्यांचा येथील दबदबा वाढला असून त्यामुळे ते जास्तीची टक्केवारी दिल्याशिवाय ठेकेदारांच्या फाईल्स काढत नसल्याचा आरोप संपूर्ण जिल्हयातील ठेकेदारांनी करणे, या संदर्भात ठेकेदार व सदस्यांच्या शिष्टमंडळाने मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांची भेट घेऊन त्यांना तक्रार निवदेन देण्यात येणे, मा.उपाध्यक्ष यांनी या संदर्भात संबधित विभागाच्या अधिकारी यांचे समवेत आयोजित केलेल्या बैठकीत मा.उपाध्यक्षांनी , कार्यकारी अभियंता यांना अडविलेल्या फाईली त्वरित निकाली काढण्याचे आदेश देण्यात येणे, सबब सदर आदेशास केराची टोपली दाखविण्यात येणे, परंतू अद्यापही कार्यकारी अभियंता यांनी आदेशाचे पालन न करता उल्लंघन करण्यात येणे, यास्तव कार्यकारी अभियंता श्री.सुरेंद्र कंकरेज व कार्यकारी अभियंता श्रीमती शैलजा नलावडे यांना तात्काळ बडतर्फ करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

**मा.श्री. हसन मुश्रीफ, मा.मंत्री ( ग्राम विकास ) यांचे निवेदन**

नाशिक जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.१ येथे कार्यकारी अभियंता या पदावर श्री.सुरेंद्र कंकरेज हे दिनांक ८/९/२०२१ पासुन व श्रीम. शैलजा नलावडे हया दिनांक २३/११/२०२१ पासून कार्यकारी

अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक ३ येथे कार्यरत आहेत. उक्त कार्यकारी अभियंता यांच्याबाबत माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये दैनिक वृत्तपत्रामधुन वृत्त प्रसिध्द झाले होते. माहे जानेवारी, २०२२ या महिन्यामध्ये श्री.कंकरेज हे दिनांक १८ जानेवारी ते २७ जानेवारी २०२२ व श्रीमती नलावडे या दिनांक ५ जानेवारी ते १० जानेवारी २०२२ या कालावधीत कोवीडने आजारी असल्यामुळे कार्यालयात उपस्थित राहू शकल्या नाहीत. तथापि, त्या नंतर या दोन्ही कार्यकारी अभियंता यांनी प्रलंबित नस्तींचा निपटारा वेळच्या वेळी केलेला आहे. इवद विभाग क्र. १ व इवद विभाग क्र. ३ येथील कामांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

**बांधकाम विभाग क्रमांक १ जिल्हा परिषद नाशिक कडील कामांची माहिती**

| लेखाशिर्ष | वर्ष | एकूण मंजूर कामे | कार्यारंभ आदेश दिलेल्या कामांची संख्या |
|---|---|---|---|
| ३०५४-२१०५ बिगर आदिवासी | सन २०२०-२१ | ५६ | ५६ |
| | सन २०२१-२२ | ५३ | ५३ |
| ५०५४-४४२४ बिगर आदिवासी | सन २०२०-२१ | १८ | १८ |
| | सन २०२१-२२ | १५ | १५ |
| नाविण्यपूर्ण | सन २०२०-२१ | २ | २ |
| | सन २०२१-२२ | ० | ० |
| अंगणवाडी बांधकामे २२३६-११०३ | सन २०२०-२१ | १६ | १५ |
| | सन २०२१-२२ | ६ | ५ |
| अंगणवाडी बांधकामे २२३८-१४२७ | सन २०२०-२१ | ९८ | ९५ |
| | सन २०२१-२२ | ० | ० |
| १५ वा वित्त आयोग २५१५-२६२८ | सन २०२०-२१ | १०० | ८५ |
| | सन २०२१-२२ | ० | ० |
| १५ वा वित्त आयोग २५१५-२६३७ | सन २०२०-२१ | ५६ | ५० |
| | सन २०२१-२२ | ० | ० |
| दिनांक १५-३-२०२२ अखेर सन २०२०-२१ या वर्षातील खर्चाची टक्केवारी ६६.०० टक्के आहे. | | | |

**बांधकाम विभाग क्रमांक ३ जिल्हा परिषद नाशिक कडील कामांची माहिती**

| लेखाशिर्ष | वर्ष | एकूण मंजूर कामे | कार्यारंभ आदेश दिलेल्या कामांची संख्या |
|---|---|---|---|
| ३०५४-२१०५ बिगर आदिवासी | सन २०२०-२१ | १२४ | १२४ |
| | सन २०२१-२२ | ६४ | ६४ |
| ५०५४-४४२४ बिगर आदिवासी | सन २०२०-२१ | ४९ | ४९ |
| | सन २०२१-२२ | ४६ | ४६ |
| नाविण्यपूर्ण | सन २०२०-२१ | २ | २ |
| | सन २०२१-२२ | ० | ० |
| अंगणवाडी बांधकामे २२३६-११०३ | सन २०२०-२१ | ३९ | ३८ |
| | सन २०२१-२२ | ० | ० |
| अंगणवाडी बांधकामे २२३८-१४२७ | सन २०२०-२१ | ६ | ६ |
| | सन २०२१-२२ | ० | ० |
| दिनांक १५-३-२०२२ अखेर सन २०२०-२१ या वर्षातील खर्चाची टक्केवारी ६६.०० टक्के आहे. | | | |

लक्षवेधीतील तक्रारींच्या मुद्यांच्या अनुषंगाने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी चौकशी केली असून, या प्रकरणी लक्षवेधीमध्ये नमूद केलेल्या तक्रारींमधील कोणत्याही मुद्यांमध्ये तथ्य आढळून आले नाही, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी शासनास कळविले आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, दोन्ही कार्यकारी अभियंत्यांविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही.

****************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२२ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा. श्री. प्रमोद पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"टोरंट कंपनीच्या दहशतीखाली भिवंडीतील सर्वसामान्य जनता असतानाच याच वादग्रस्त कंपनीला शासनाकडून दिवा, मुंब्रा, कळवा हा भाग आंदण म्हणून देण्याचासुरु असलेला प्रयत्न दि.७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे,भिवंडी मध्ये मिटरसाठी जादा शुल्क आकारणे, वीज चोरीचे खोटे गुन्हे दाखल करणे, विना पावती आर्थिक व्यवहार करणे व दिशाभूल करुन शासनाचा पैसा राजरोसपणे लूटत असणे, टोरंट कंपनीकडून सेक्यूर मेक कंपनीचे २०-३० टक्के जादा जलदगतीने चालणारे मिटर लावून ग्राहकांची लुबाडणूक करण्यात येणे, आधीच राज्यात आर्थिक मंदीचे सावट असताना टोरंट कंपनीच्या एकाधिकारशाहीमुळे भिवंडी तालुक्यातील उद्योगधंदे व पावरलूम बंद पडलेले असणे, तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामसभेमध्ये टोरंट हटाव असे ठराव करुन शासनास दिलेले असणे, परंतु पोलीस प्रशासनाला हाताशी धरुन तक्रार करणाऱ्या ग्राहकांवर खोटे गुन्हे दाखल करणे, कंपनी प्रशासनाकडून ग्राहकांना दहशतीखाली ठेऊन लुबाडण्याचे सुरु असलेले सर्रास प्रकार, टोरंट कंपनीचा अरेरावीपणा तसेच दहशत दाखवून सर्वसामान्यांची सुरु असलेली पिळवणूक, या कंपनीला महाराष्ट्रातून हद्दपार करण्याची आवश्यकता असताना शासनाकडून टोरंट कंपनीसाठी पायघड्या घालून दिवा, मुंब्रा, कळवा, शिळ असा भाग देण्याची प्रक्रिया सुरु असणे, कामाचा आदेश दिला नसताना व अंदाजपत्रक मंजूर नसतानाही दोस्ती कंम्पाऊंड मधील डीपी रोड, मुंब्रा रेती बंदर रस्त्यावर आर.एस.जे. ६ - ६ चे पोल टोरंटकंपनीने उभे केलेले असून परवानगी नसतानाही एरिया विकत घेतलेला असणे, तक्रार केल्यास तुम्हाला पोलीसांकडून तुरुंगात डांबू अशी अरेरावीची भाषा करुन कळवा व दोस्ती परिसरात नागरिकांवर खोटे गुन्हे दाखल केलेले असणे, महागाई कमी न होता सर्वसामान्यांवर अधिक भार पडण्याची शक्यता, ग्राहकांना युनिटचा दर सध्यापेक्षा वाढविलेला असणे, अन्यायग्रस्त टोरंट कंपनीचे भिवंडी मधीलच कंत्राट रद्द करण्याची आवश्यकता असताना, शासकीय इमारती विना मोबदला कोणत्याही कंपनीस देणे ही सरकारी मालमत्तेची लूट असताना, महावितरणची कार्यालये विना मोबदला टोरंट कंपनीला वापरण्यास देण्यात येणे, भिवंडी प्रमाणे आपल्यावर अन्याय होऊ नये म्हणून स्थानिक जनतेने सर्वपक्षीय मोर्चाकाढून टोरंट कंपनीचा केलेला निषेध पाहाता, शासनाने जनतेचे हित जपण्यासाठी दिवा, कळवा, मुंब्रा हा भाग टोरंट कंपनीला न देता, शासनाने सर्वसामान्य ग्राहकांचे हीत जपण्यासाठी वादग्रस्त असलेल्या या कंपनीला महाराष्ट्रातूनच हद्दपार करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १४ (७) अन्वये वीज वितरण परवानाधारक कंपनीस कंपनीच्या परिक्षेत्रातील ठराविक भागांचा वीज वितरण कारभार सांभाळण्यासाठी फ्रॅन्चायझीची नियुक्ती करण्याची तरतूद आहे. ज्या विभागांत वीजेच्या गळतीचे प्रमाण जास्त आहे, वीज बील वसूलीचे प्रमाण कमी आहे, तसेच वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे अशा व इतर सर्व समावेशक बाबींचा विचार करुन असे विभाग फ्रॅन्चायझी तत्वावर खाजगी कंपनीस ठराविक कालावधी करिता देण्याचा धोरणात्मक निर्णय महावितरणने घेतला होता. त्यानुसार वितरण फ्रॅन्चायझी नियुक्तीसाठी खुल्या व पारदर्शक पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती व यशस्वी निविदाकार म्हणून मे. टोरंट पॉवर लि. कंपनीस भिवंडी येथील विज वितरण फ्रॅन्चायझी म्हणून नियुक्ती केलेली आहे. नियुक्ती नंतर मे. टोरंट पॉवर कंपनीने भिवंडी येथील वीज प्रणाली यंत्रणेत सुधारणा

केलेली असून त्यामुळे भिवंडी वितरण फ्रेन्चायझी विभागातील वीज वितरण हानीचे प्रमाण ४२% (वर्ष २००६-०७) पासून १६% (वर्ष २०२१-२२) पर्यंत कमी झाले आहे. मे. टोरंट पॉवर कंपनी मार्फत भिवंडी वितरण फ्रेन्चायझी विभागातील वीजहानी कमी करण्याच्या दृष्टीने व वीजचोरी रोखण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये जुने (इलेक्ट्रोमॅकेनिकल) नादुरुस्त असलेले वीज मिटर काढून त्याजागी नामांकित कंपनीचे व आय.एस. (Indian Standard) मानांकनप्राप्त इलेक्ट्रॉनिक मीटर बसविण्यात आलेले आहेत. भिवंडी मंडळात मे. टोरंट पॉवर कंपनीतर्फे जवळपास सर्व ग्राहकांना त्यांच्या प्रत्यक्ष वीज वापरानुसार व मीटर वाचनाप्रमाणे देयके देण्यात येतात. मीटर बिलाबाबत कोणत्याही ग्राहकास शंका निर्माण झाल्यास मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियमानुसार मीटर चाचणी शुल्क भरल्यास त्यांचे मीटर तपासणी करुन त्याचा अहवाल ग्राहकास देण्यात येतो. या नंतरही ग्राहकाचे समाधान न झाल्यास महावितरणच्या ठाणे येथील प्रयोगशाळेत मीटरची तपासणी करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. भिवंडी शहरातील ग्राहकांना त्यांचे इच्छेनुसार महावितरणच्या मान्यताप्राप्त पुरवठा दाराच्या यादी मधील कोणत्याही पुरवठादाराचे मीटर मे. टोरंट पॉवर कंपनीच्या तपासणी नंतर वापरण्यास परवानगी दिलेली आहे. तसेच या मीटरचे मूळ सील न तोडता सदर मीटरची चाचणी करुन मे. टोरंट पॉवर कंपनी यांनी स्वत:चे अतिरिक्त सील लावावे अशा सूचना मे. टोरंट पॉवर कंपनीस दिलेल्या आहेत. मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या मान्यतेनुसार वेळोवेळी लागू झालेली वीजदरवाढ महावितरण तसेच वितरण फॅन्चायझीच्या सर्व ग्राहकांना लागू करण्यांत येते व त्याप्रमाणेच सर्व ग्राहकांना वीजदेयके देण्यात येतात. मे. टोरंट पॉवर कंपनीस वीजदरवाढ करण्याबाबत कुठलेही अधिकार नाहीत. यंत्रमाग धारकांना महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार वीजबिलात सवलत देण्यात येते. शासनाने महावितरणसाठी लागू केलेल्या अनुदानास पात्र असलेल्या भिवंडी येथील ग्राहकांची अनुदानाची रक्कम मे. टोरंट कंपनीस दुसऱ्या महिन्यात महावितरणतर्फे समायोजीत करण्यात येते. तसेच भिवंडी मधील ग्राहकांकडून वसूल करण्यात आलेले विजशुल्क व विज विक्रीकर शासनाकडे दरमहा जमा करण्यात येते. ग्राहकांसाठी विज बिल भरणा करणे करीता मे. टोरंट पॉवर लिमिटेड यांचे स्वत:चे ४ अधिकृत विज देयक भरणा केंद्र व कंत्राटी पध्दतीमध्ये १० विज देयके भरणा केंद्र उभारण्यात आली आहेत. त्याचबरोबर दोन फिरते वाहनांची सोय करण्यात आली असुन ती प्रत्येक गावामध्ये जात असते व ठाणे जनता सहकारी बँकमध्ये सुध्दा विज बिल भरणा करणेसाठी ग्राहकांची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. तसेच ऑनलाईन पध्दतीने विज बिल भरणा करण्याची सेय उपलब्ध आहे. विद्युत अधिनियम २००३ च्या तरतुदीनुसार तसेच महावितरण व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचना नुसार वीज चोरी अंतर्गत कलम १३५ व १२६ मधील प्रावधानानुसार भिवंडी मध्ये फ्रेन्चायझी विभागांतर्गत मे. टोरंट पॉवर कंपनीद्वारा कायदेशीर कारवाई करण्यात येते. याबाबत महाराष्ट्र शासनाकडून मे. टोरंट पॉवर लि. कंपनीच्या सक्षम अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

शिळ, मुंब्रा, कळवा या विभागाकरीता विद्युत अधिनियम २००३ चे कलम १४ (७) मधील तरतुदीनुसार वितरण फ्रेन्चायझी नियुक्तीसाठी खुल्या व पारदर्शक पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती व यशस्वी निविदाकार म्हणून मे. टोरंट पॉवर लि. कंपनीस शिळ, मुंब्रा, कळवा या विभागाकरीता वितरण फ्रॅन्चायझी म्हणून नियुक्त करण्यात आले. शिळ, मुंब्रा, कळवा या उपविभागाच्या विज वितरणाचे संचलन दिनांक ०१.०३.२०२० पासून मे. टोरंट पॉवर लि. कंपनीस सोपविण्यात आले आहे. वितरण फ्रँचायझी करारातील कलम ५ मधील तरतुदी नुसार, वितरण फ्रॅन्चायझी विभागातील वितरण मालमत्ता ज्यामध्ये उच्चदाब/लघुदाब भूमिगत/उपरी वाहीन्या, उपकेंद्र व त्यामधील नियंत्रण कक्ष तसेच विभागातील संबंधीत प्रशासकीय इमारती यांचा वितरण मालमत्ता म्हणून अंतर्भाव असल्याकारणाने करारातील कालावधीकरीता ते हस्तांतरण करणे आवश्यक असते. वितरण फ्रँचायझी करार दि.११.०२.२०१९ कलम ५.१.१ अन्वये वितरण फ्रँचायझी ने मे. टोरंट पॉवर जि. यांना महावितरणचे स्थापत्य

एब-१८६-१३

मालमत्ता विना मोबदला वापरण्यास मुभा देण्यात आली आहे. दोस्ती कंपाऊंड डीपी रोड, मुंब्रा रेती बंदर येथे विज वितरणासाठी टोरंट पॉवर कंपनीने कुठलेही खांब उभारलेले नाहीत. संदर्भाधीन खांब हे अस्थायी स्वरुपात इंटरनेट सेवेसाठी टाकण्यात आलेले होते. त्यांनतर ते काढण्यात आलेले आहेत. तसेच फ्रॅन्चायझी करारातील तरतुदीनुसार प्रत्यक्ष हस्तांतरणापूर्वी करावयाच्या समांतर संचलनावेळी दोस्ती कंपाऊंड येथील मे. टोरंट पॉवर कंपनीच्या कर्मचाऱ्यास स्थानिकांकडून मारहाण करण्यात आली. त्यानुसार संबधितांवर मे. टोरंट पॉवर कंपनीतर्फे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. शिळ, मुंब्रा, कळवा या विभागाकरीता वितरण फ्रॅन्चायझी म्हणून नियुक्त केलेल्या मे. टोरंट पॉवर लि. कंपनीचा ठेका रद्द करावा या मागणीसाठी आगरी युवक संघटना व स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने दि. १९.०१.२०१९ रोजी धडक मोर्चा आयोजित केला होता. तसेच मुंब्रा, शिळ, कळवा उपविभागामध्ये टोरंट पॉवर कंपनीची वितरण फ्रॅन्चायझी म्हणून नेमणूक रद्द करण्याबाबतचे आगरी युवक संघटना यांनी महावितरणला पत्र दिले होते.

*******************************

एच–१८६–२.

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. ९४

**श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ९४ पुढील प्रमाणे आहे :-**

"नाशिक जिल्हापरिषद येथील तत्कालीन शिक्षणाधिकारी श्री. प्रवीण पाटील यांनी नाशिक जिल्ह्यातील काही शैक्षणिक संस्था मधील कर्मचारी यांना शासनाचा आकृतीबंध असतानाही शिपाई पदाच्या मान्यता व वेतन श्रेणी सन २००८ पासून देण्यात येणे, जवळपास १९ मान्यता ह्या त्यांच्या कार्यकाळात एकाच दिवशी देण्यात आल्या त्यामुळे सदर प्रकरणामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होणे, त्याच प्रमाणे कनिष्ठ लिपिकाच्या सन २०१० पासून ७ मान्यता देऊन त्याचदिवशी नियमित वेतन श्रेणी लागू करून शासनाचे आर्थिक नुकसान करणे, त्याचप्रमाणे माहे जून, २०१७ च्या शासन निर्णया प्रमाणे पवित्र पोर्टल लागू झाल्यापासून शिक्षण सेवक यांची नियुक्ती करता येत नाही, असे असताना सुद्धा तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी दिनांक २ जानेवारी, २०१२ ते दिनांक १५ जून, २०१७ रोजी नियुक्त ३० शिक्षण सेवक यांना मान्यता देणे, सदर प्रस्ताव हे शिक्षणाधिकारी कार्यालयात ५ मार्च, २०२० रोजी जमा करण्यात येणे व सदर प्रस्तावास दि.२० मार्च, २०२० रोजीपासून देशात कडक लॉकडाऊन असतानाही एकाच दिवशी म्हणजे दि.२०मार्च, २०२० रोजी मान्यता देणे व त्याच तारखेला नियमित वेतनश्रेणी मान्यता नस्तीवर अधिक्षक, उपशिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी नसतांनाही देणे, त्यामुळे सदर मान्यता प्राप्त शिक्षक सेवकांना फरक बिलाच्या माध्यमातून लाखोचा फायदा करून देणे व शासनाचे आर्थिक नुकसान करणे, सर्व मान्यता दिलेले कर्मचाऱ्यांना बॅकडेटेड (मागील तारखा टाकून) नियुक्त्या दिल्या असून प्रत्यक्षात कार्यरत नसणे, सुमारे २५ शिपायांना मान्यता आकृतीबंधात शिपाई पद मंजूर नसतांनाही शिपाई पदास रोस्टर न तपासता मान्यता दिल्यामुळे शासनाच्या तिजोरीवर भार पडणे, त्याचबरोबर दिवद येथील अर्धवेळ ग्रंथपाल श्री. पेंढारी यांना नियमबाहय शिक्षक मान्यता देण्यात येणे, सदर वैयक्तिक मान्यता देतेवेळेस कार्यालयीन टिप्पणीमध्ये उपशिक्षणाधिकारी, कार्यालयीन अधीक्षक यांच्या टिप्पणी घेणे गरजेचे असताना तसे न करता सदर मान्यता प्रस्ताव हे संबंधित लिपिक यांच्या स्वाक्षरीने मंजूर करून शिक्षणाधिकारी यांनी मान्यता देणे, त्याच प्रमाणे अंशतः अनुदानित ते अनुदानित, विनाअनुदानित वरून अनुदानित वर बदली संदर्भातील जवळपास १०० प्रस्तावांना एकाच दिवशी मान्यता देणे, सदर प्रकरणाची व तत्कालीन शिक्षणाधिकारी,

संबंधित लिपिक यांची खातेनिहाय चौकशी करून कायदेशीर कार्यवाही करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**श्रीमती वर्षा गायकवाड, मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन**

श्री. प्रवीण श्रीधर पाटील शिक्षणाधिकारी (निरंतर), जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नाशिक या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक १८.०३.२०२० ते दिनांक १०.०८.२०२० या कालावधीत सोपवण्यात आला होता. श्री प्रभाकर पेंढरी अर्धवेळ ग्रंथपाल यांना शिक्षण सेवकपदी मान्यता देण्याचा प्रस्ताव नाकारण्यात आलेला असल्याचे विद्यमान शिक्षणाधिकारी (माध्यमिक)नाशिक यांनी कळविले आहे. मात्र सदर कालावधीत तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी शिक्षण सेवक पदाच्या ३६ प्रस्तावांना, विनाअनुदानित पदावरून अनुदानित पदावर बदलीस मान्यता देण्याच्या ८९ प्रस्तावांना, कनिष्ठ लिपिक पदाच्या ९ प्रस्तावांना, शिपाई पदाच्या २० प्रस्तावांना व अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीस मान्यता देण्याच्या ६ प्रस्तावांना तसेच विनाअनुदानित तत्त्वावरील २ शिक्षकांना मान्यता दिलेल्या आहेत. तसेच अंशतः अनुदानित वरुन अनुदानित पदावर बदली करण्याच्या ८७ शिक्षकांचा प्रस्ताव कार्यालयात दि.२९.०७.२०२० रोजी प्राप्त झालेल्या प्रस्तावास दि. ३१.०७.२०२० रोजी मान्यता दिल्याचे निदर्शनास येत आहे. सर्व वैयक्तिक मान्यतांच्या कार्यालयीन टिप्पणीत २ नस्तींमधील टिप्पणीवर उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची स्वाक्षरी आहे व उर्वरित नस्तीमधील टिप्पणीवर संबंधित लिपिक, सहाय्यक प्रशासन अधिकारी तथा प्रभारी अधीक्षक व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या स्वाक्ष-या असल्याचे निदर्शनास येत आहे. श्री. प्रवीण श्रीधर पाटील तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), नाशिक यांनी दिलेल्या वैयक्तिक मान्यतेच्या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करण्यात येत आहे.

******************************

लक्षवेधी सूचना
नगर विकास विभाग / नवि-१३

**मा.विधानसभा सदस्य श्री.भिमराव तापकीर यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे.**

*"पुणे महानगरपालिका हदीतील वडगाव बुद्रुक येथील सर्व्हे नं.४३, ४७, ४८, ४९ पुनर्वसित गावठाणातील घरांवर नजरचुकीने बीडीपी आरक्षण टाकण्यात आले असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी आणि रहिवासी संबंधित प्रशासनास सदरचे बीडीपी आरक्षण काढण्याबाबत पत्रव्यवहार, बैठका घेतल्या असणे, सदर रहिवासियांना कागदोपत्री बिडीपी आरक्षण असल्याने मोडकळीस आलेले घरे दुरुस्त करणे अथवा विकसन करणे कामी अडथळा येत असणे, त्यामुळे नागरिक धोका पत्करून आहे त्या अवस्थेत वास्तव्य करीत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व त्यावरील शासनाची प्रतिक्रिया."*

**मा.मंत्री (नगर विकास) यांचे निवेदन**

सन १९९७ च्या पुणे प्रादेशिक योजनेनुसार स.नं.४३, ४५ ते ४९ मौ.वडगाव बु. या जागा भागशः शेती व नाविकास व भागशः रहिवास विभागात दर्शविल्या होत्या. सन १९९७ मध्ये वडगाव बु. या गावाचा समावेश पुणे महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीत करण्यात आला आहे. पुणे महानगरपालिकेने नव्याने समाविष्ट गावांकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेमध्ये उक्त जागा निवासी विभागात होत्या. तथापि उक्त अधिनियमाचे कलम २९ अन्वये पुणे महानगरपालिकेने पुनर्प्रसिध्द विकास योजनेमध्ये उक्त जागांचा समावेश बायो डायव्हर्सिटी पार्क (BDP) या आरक्षणात करण्यात आला आहे. शासन निर्णय दि.०५.०८.२०१५ अन्वये BDP आरक्षणास अंतिम मंजूरी दिली असून यानुसार स.क्र.४३, ४७, ४८, ४९ भागातील, सन २००५ पूर्वीच्या सर्व विकासनाखेरीज करुन (कमिटेड डेव्हलपमेंट वगळून) उर्वरित भागातील BDP आरक्षण कायम केले आहे. वडगाव बु. स.क्र.४३, ४७, ४८ हे पूर्णपणे व स.क्र.४९ अंशतः BDP आरक्षणात दर्शविले आहेत.

पेठ वडगाव बु. स.क्र.४३, ४७, ४८ व ४९ हे पुनर्वसित गावठाण म्हणून शासनाने दि.१०.०२.१९८३ च्या अध्यादेशान्वये घोषित केले आहे. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून स.क्र.४७ च्या काही भागावर दि.१७.०७.१९९६, दि.१०.०३.१९९६ रोजी अकृषिक परवानगी दिल्या आहेत. तसेच काही भागावर रहिवास वापराचे नकाशे दि.३०.०५.१९९६ व दि.२४.०१.१९९५ रोजी मंजूर करण्यात आले आहेत.

पुणे शहराच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेतील पेठ वडगाव बु., स.क्र.४३, ४७, ४८ व ४९ या BDP आरक्षणाने बाधीत मिळकतींचा समावेश रहिवास विभागात करणेसाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही पूर्ण करून सदर प्रस्ताव पुणे महानगरपालिकेने दि.०६.०३.२०१९ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

यापूर्वी विषयांकित स.क्र.४३, ४७, ४८, ४९ या जागांलगतच्या स.क्र.४५ व ४६ या जागा BDP आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत पुणे महापालिकेने कलम ३७ अन्वये सादर केलेला प्रस्ताव शासनाने दि.२६.०२.२०१८ रोजीच्या कलम ३७(२) अन्वयेच्या अधिसूचनेद्वारे नामंजूर केला आहे. आता पुणे महापालिकेने विषयांकित स.क्र.४३, ४७, ४८, ४९ या जागा BDP आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतचा फेरबदल प्रस्ताव शासनास सादर केला आहे. वास्तविक पुणे

महानगरपालिकेने असे तुकड्या-तुकड्यांमध्ये विविध जागांचे प्रस्ताव करुन मान्यतेसाठी सादर करणे नियोजनदृष्ट्या योग्य नाही.

वरील वस्तुस्थिती पाहता, पुणे महापालिकेच्या वाढीव हद्दीच्या प्रारुप विकास योजनेमध्ये निवासी विभागात दर्शविलेल्या जागा कलम २९(१) अन्वये पुनर्प्रसिध्द विकास योजनेमध्ये BDP आरक्षणात दर्शविण्यामागची महानगरपालिकेची भूमिका, C-DAC संस्थेने निश्चित करुन दिलेली BDP आरक्षणाची हद्द, त्यानुसार शासनाने दि.०५.०८.२०१५ च्या अधिसूचनेद्वारे मंजूरी देताना करण्यात आलेली तरतुद, या तरतुदीनुसार होऊ शकणारी कार्यवाही, विषयांकित जागांबरोबरच अशा स्वरुपाच्या अन्य जागांच्या विभाग बदलाबाबत प्रस्ताव विचाराधीन असल्यास, अशा जागांच्या विभाग बदलाबाबत सर्वंकष पुनर्अभ्यासासह आणि सकारण/ठोस कारणमिमांसेसह, अशा सर्व जागांचा एकत्रित प्रस्तावात विचार करुन कलम ३७(१) अन्वये वैधानिक कार्यवाही करुन असा प्रस्ताव पुणे महापालिकेमार्फत शासनास सादर होणे सयुक्तिक होईल. या पार्श्वभूमीवर पुणे महापालिकेकडील दि.०६.०३.२०१९ रोजीच्या प्रस्तावास अनुसरुन सर्वंकष फेरप्रस्ताव वैधानिक कार्यवाहीअंती शासनास मंजूरीसाठी पाठविण्याबाबत कळविण्यात येईल.

येथे नमूद करण्यात येते की, शासनाने दि.०५.०८.२०१५ च्या अधिसूचनेद्वारे BDP आरक्षणासंदर्भाने विनिमय मंजूर केला आहे. या मंजूर विनियमामधे, खालील वर्गवारीतील जागा, ज्यावर सक्षम प्राधिकरणाने दि.२१.०३.२००५ पुर्वी विकास परवानगी/उपविभागणी/रेखांकन/बांधकाम परवानगी दिली आहे आणि अशी परवानगी त्यावेळी वैध असेल तर अशा जागा BDP आरक्षणातून वगळल्या जातील, अशी तरतूद आहे.

५) ज्या जागांवर दि.२१.०३.२००५ पुर्वी रेखांकन आणि सर्व अथवा काही भूखंडावर बांधकाम परवानगी दिली आहे आणि त्यानुसार भागश: अथवा लक्षणीय विकास झाला आहे.

६) ज्या जागांवर दि.२१.०३.२००५ पुर्वी एका अथवा अनेक इमारतींकरिता बांधकाम परवानगी दिली आहे आणि त्यानुसार लक्षणीय विकास झाला आहे.

७) ज्या जागांवर दि.२१.०३.२००५ पुर्वी विकास परवानगी/उपविभागणी/रेखांकन/बांधकाम परवानगी दिली आहे आणि ती या तारखेस वैध आहे परंतु त्यानंतर सदर जागा BDP आरक्षणाखाली आल्यामुळे अशा परवानगीचे नुतनीकरण करण्यात येऊ शकलेले नाही.

८) ज्या जागा/भूखंड दि.२१.०३.२००५ पुर्वी, सक्षम प्राधिकरणाकडील आदेशान्वये ज्या अटी/शर्तीवर गावठाण पुनर्वसन योजना/प्रकल्पग्रस्त योजना/इंदिरा आवास योजना याकरिता वाटप केल्या असतील.

उपरोक्त तरतुदीनुसार विषयांकित जागांवरील अथवा BDP आरक्षणाखालील अन्य जागांवरील विकासास दि.२१.०३.२००५ पुर्वी सक्षम प्राधिकरणाने परवानगी दिली असेल आणि ती त्यावेळी वैध असेल तर अशा जागा BDP आरक्षणातून वगळल्या जाऊन त्याठिकाणी पुणे महानगरपालिकेकडून परवानगी घेऊन विकास करणे अथवा अशी परवानगीप्राप्त घरे मोडकळीस आलेली असल्यास त्यांची दुरुस्ती/पुर्नविकास करण्यास प्रत्यवाय नाही.

*************

महाराष्ट्र विधानसभा

<u>सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन</u>

<u>विधानसभा लक्षवेधी क्र.१५२०</u>

श्री. ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५२० पुढीलप्रमाणे आहे :-

"नाशिक महापालिकेच्या तसेच खासगी शाळांतील विद्यार्थ्यांना निकृष्ट आहार पुरवल्या प्रकरणी दोन वर्षापूर्वी सेंट्रल किचन योजनेच्या १३ ठेकेदारांना निकृष्ट आहार पुरवठा केल्याप्रकरणी अपात्र करणे, आता यापैकी एका ठेकेदाराच्या हिरावाडीतील ठाकरेमळा परिसरातील स्वामी विवेकानंद बचत गटाच्या गोदाम तपासणीत शेजारील बंगल्यात शासनामार्फत पुरविण्यात आलेली तांदळाची २८१ (१५ हजार किलो) पोती सापडून यामध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असणे, सदरहू तांदूळ साठ्याचा वापर केला असता तर एका दिवसात सुमारे १ लाख १२ हजार विद्यार्थ्यांची खिचडीव्दारे भुक भागण्याची शक्यता असणे, स्वामी विवेकानंद बचतगटाने शासनाचा तांदुळसाठा संपवून उलट आपणच आपल्याकडील १० हजार किलो तांदुळ स्वत: आणून खिचडी शिजवल्याचा दावा करीत शिक्षण विभागाची फसवणूक करण्यात येणे, विशेष म्हणजे महापालिका आयुक्तांनी याआधी १३ ठेकेदारांचे (५० टक्के बिल) २ कोटी ६९ लाख रुपयांचे स्थगित ठेवलेले बिल देण्यासाठी शासनातील उच्च पदस्थ व लोकप्रतिनिधींकडून बैठक घेऊन अदा करणेबाबत आयुक्तांवर दबाव टाकून आदेशित करण्यात येणे, सापडलेल्या २८१ पोती प्रकरणी चौकशी करुन महापलिकेला सादर केलेल्या अहवालात गोदामात तांदुळ राहिले नसल्याचे नमूद करण्यात येणे, यामुळे शेजारील बंगल्यात ३०० पेक्षा अधिक शासनाचे शिक्के असलेली २८१ पोती कशी आली याचे उत्तर देण्यास हेतुपूर्वक टाळण्यात येणे, यामुळे महापालिक आयुक्तांना सादर झालेला अहवाल हा संबंधीत अधिकारी व ठेकेदार संस्थेला बेकायदा संरक्षण देणारा असल्याने अहवालाबाबत निर्माण झालेले संशयाचे वातावरण, सन २००३ पर्यंत पोषण आहार पुरवठा करणाऱ्या महिला बचत गटाकडून काढून पालिका प्रशासनाने सेंट्रल किचनच्या गोंडस नावाखाली १३ ठेकेदार संस्थांना देण्यात येणे, परिणामी महिला बचत गटावर ओढवलेले बेराजगारीचे व उपासमारीचे संकट, त्यानंतर १३ ठेकेदार संस्थांनी केलेला गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर महिला बचत गटांना पुन्हा पोषण आहार पुरविण्याचे काम देण्याचा निर्णय घेऊन

यासाठी निविदा काढण्यात येणे, त्यासाठी ४ ते १८ फेब्रुवारी पर्यंत मुदत देण्यात आली असताना अचानक निविदा प्रक्रियेवर स्थगिती घेऊन अपात्र १३ ठेकेदारांपैकी एका ठेकेदार संस्थेला काम दिल्याचा घडलेला आश्चर्यजनक प्रकार, सदरहू प्रकरणात कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार होऊन शासकीय निधीचा झालेला अपव्यय तसेच विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या पोषण आहारावर त्याचा गंभीर परिणाम होणे, दरम्यान ह्या प्रकरणातील ठेकेदार ऋषिकेश चौधरी यांनी सदर लपवलेला तांदुळ हा शासनाचा असल्याचे स्वत:हून मान्य केले असणे, सदरहू प्रकरणाची शासनाने उच्च स्तरावरुन एसआयटीव्दारे चौकशी करुन महापालिकेतील संबंधीत दोषी अधिकारी, ठेकेदार यांचेवर कठोर कारवाई करुन, पोषण आहार वितरणाचे काम गरीब गरजू महिला बचत गटांना देणेबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य जाणीवपूर्वक दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थी व महिला बचत गटांमध्ये निर्माण झालेले तीव्र संतापाचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## निवेदन

**(प्रा. वर्षा गायकवाड, शालेय शिक्षण मंत्री)**

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत नाशिक महानगरपालिकेमार्फत नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील शाळांना केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीमार्फत तयार आहाराचा पुरवठा करण्यासाठी १३ संस्थांची निवड केली होती. तथापि, आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी सदर संस्थांनी करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग केल्यामुळे प्रस्तुत संस्थासोबत केलेला करारनामा मार्च, २०२० मध्ये संपुष्टात आणला आहे. याबाबत शासनस्तरावर सुनावणी आयोजित करुन प्रस्तुत प्रकरणी शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी स्थळपाहणी अहवाल सादर करेपर्यंत तात्पुरती स्थगिती दिली होती.

शिक्षण संचालक (प्राथ.), यांच्या अध्यक्षतेखालील समितीतील सदस्यांनी सदर १३ संस्थापैकी असलेल्या स्वामी विवेकानंद महिला स्वयंसहायता बचत गट, ता. निफाड, जि. नाशिक या संस्थेच्या स्वयंपाकगृहास दि.२४ फेब्रुवारी, २०२२ रोजी भेट दिली असता त्यांच्याकडे एकूण १४,०५०/- किलोग्रॅम तांदूळ अवैधरित्या आढळून आला आहे. सदर अवैध तांदूळ साठ्याच्या अनुषंगाने संबंधित संस्थेकडून शासकीय दराने वसुली करणे, संबंधित संस्थेचा करारनाभा / कार्यारंभ आदेश रद्द करणे, संबंधित संस्थेस अन्न शिजवून पुरवठा करणेबाबत अथवा तत्सम

प्रकारचे कोणतेही कामकाज यापुढे देण्यात येवू नये तसेच, संबंधित संस्थेची अनामत रक्कम व इतर जमा असलेल्या सर्व प्रकारच्या रकमा शासन दरबारी जप्त करण्यात येणे याप्रमाणे कारवाई प्रस्तावित आहे.

शिक्षण संचालक (प्राथ.) यांनी संबंधित १३ संस्थाबाबतचा स्थळपाहणी अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने यापूर्वी निवड करण्यात आलेल्या १३ संस्थांचे करारनामा रद्द करण्याबाबत आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांचा निर्णय कायम ठेवलेला आहे व नव्याने संस्थांची निवड करण्याची प्रक्रिया राबविणे प्रस्तावित आहे.

**********

ॲड. राहूल कुल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मायणी,ता. खटाव, जि. सातारा येथील रूरल इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च सेंटर व हॉस्पिटल, मायणी या मेडिकल कॉलेजच्या प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणावर बोगस कागदपत्रे तयार केली असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली असणे, सदर मेडिकल ॲडमिशन होत असताना संस्था चालकांनी बारावी पासचे सर्टिफिकेट, मायग्रेशन सर्टिफिकेट, तसेच शाळेचे दाखले बोगस तयार तयार करून विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश देऊन प्रक्रिया राबविली असणे, विद्यार्थ्यांना कमी मार्क असतांना मेरिटमध्ये येण्यासाठी सर्व बोगस कागदपत्रे तयार करून ती शासनास सादर करून मायणी येतील रूरल इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च सेंटर हॉस्पीटल येथे ॲडमिशन प्रक्रिया केली असून तेथे बोगस डॉक्टर तयार केले असे निदर्शनास आले असणे,यामध्ये तत्कालीन संस्थेतील पदाधिकारी व कर्मचारी यांनी सांगणमताने हे काम केले असल्याचे निदर्शनास आले असून या संदर्भात १८/०५/२०२१ रोजी मा. पोलीस अधीक्षक सातारा यांच्याकडे तक्रार दाखल केली असणे, त्यासंदर्भात अद्याप कोणतीही चौकशी केली नसणे कोणताही गुन्हा अद्याप दाखल झालेला नसणे, यामुळे पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशास मुकावे लागल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात मोठा असंतोष पसरलेला असणे असेच जाळे महाराष्ट्र मध्ये अनेक ठिकाणी चालू असणे यामुळे पात्र विद्यार्थ्यांच्या मनात पसरलेला असंतोष याबाबत शासनाने करायची कार्यवाही व उपयोजना."

## मा.मंत्री ( वैद्यकीय शिक्षण ) यांचे निवेदन

रुरल इन्स्टिटयूट ऑफ आयुर्वेद रिसर्च सेंटर व हॉस्पीटल, मायणी, ता.खटाव, जि.सातारा या आयुर्वेद महाविद्यालयामध्ये सन २००६ ते २०१० या कालावधीत इयत्ता १२ वी चे बनावट मार्कलिस्ट, बनावट मायग्रेशन सर्टिफिकेट, बनावट शाळा सोडल्याचा दाखला या आधारे ०४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन बी.ए.एम.एस. या आयुर्वेद पदवी अभ्यासक्रमाची पदवी प्राप्त केली असल्याची तक्रार श्री. मनोज सुरेश कांबळे, रा.फलटण, ता.फलटण, जि.सातारा यांनी पोलीस अधिक्षक, सातारा यांच्याकडे असून त्याबाबत स्थानिक गुन्हे शाखा, सातारा यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे.

सन २०१५ पर्यंत बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमाचे खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील प्रवेश हे खाजगी महाविद्यालयांच्या संघटनेमार्फत घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेद्वारे करण्यात येत होते. त्यावेळी कार्यरत प्रवेश नियंत्रण समितीद्वारे त्यांची पडताळणी करण्यात येत होती. सन २०१६-१७ या

शैक्षणिक वर्षापासून आरोग्य विज्ञान व्यावसायिक अभ्यासक्रमाचे सर्व खाजगी व शासकीय महाविद्यालयातील प्रवेश हे महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था ( प्रवेश व शुल्क यांचे विनियमन ) अधिनियम, २०१५ या कायद्यातील तरतुदीनुसार करण्यात येतात. त्यानुसार सर्व प्रवेश प्रक्रिया ही प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्याद्वारे शासनाने अधिसूचित केलेल्या प्रवेश नियमानुसार करण्यात येते. सदर प्रवेशास प्रवेश नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यता देण्यात आल्यानंतर पडताळणीअंती विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना नोंदणी व पात्रता प्रदान करण्यात येते.

पोलीस अधिक्षक, सातारा यांच्याकडे प्राप्त तक्रारीस अनुसरुन पोलिसांमार्फत रुरल इन्स्टिटयूट ऑफ आयुर्वेद रिसर्च सेंटर व हॉस्पीटल, मायणी, ता.खटाव, जि.सातारा या महाविद्यालयातील ०४ विद्यार्थ्यांसंबंधात चौकशीमध्ये सर्व संबंधितांकडून माहिती घेण्यात येत आहे. चौकशीअंती सदर प्रकरणी जो निष्कर्ष येईल, त्यानुसार नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

***

## महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२२ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री. विश्वनाथ भोईर, शांताराम मोरे, श्रीनिवास वनगा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे. :-

" अठरा लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वाढता विस्तार, कल्याण शहरामध्ये वाहतुकीची होणारी प्रचंड कोंडी, परिणामी, नागरिक रुग्ण यांची होणारी प्रचंड गैरसोय, कल्याण शहरातून हजारो शासकीय, निमशासकीय कर्मचारी व कामगार भिवंडी, कोनगांव, मानकोली, कोल्हेर, कशेळी येथील गोडाऊन पट्टा व परिसरातील कंपनी मध्ये कामानिमित्त जात असतात. या कामगारांना नेण्या-आणण्यासाठी कल्याण येथून दररोज ७०० अवैध प्रवासी बसेस भिवंडी व परिसरामध्ये दिवसभर जाणे-येणे करत असने, परिणामी कल्याण शहरा मध्ये दिवसभर वाहतुकीची कोंडी होने, दिवसभर होणा-या वाहतुकीच्या कोंडीमुळे सरकारी कर्मचारी, अधिकारी वेळेवर कर्तव्यावर पोहचू शकत नसण, रूग्णवाहिका देखील या वाहतूक कोटीत फसल्यामुळे रूग्ण वेळीच रूग्णालयात पोहचू न शकणे, अग्निशमन दलाचे वाहन सदर वाहतुकी च्या कोंडीमुळे गंभीर स्वरुपाचे रुग्ण दगावण्याची शक्यता नाकारता न येणे, अशग्निमन दलाचे वाहन सदर वाहतुकीच्या कोंडीत अडकल्यास दुर्घटनेच्या ठिकाणी वेळेवर पोहचू न शकने, वाहतूक नियंत्रणासाठी ठेवण्यात आल्या खाजगी व्यक्ती व वाहतूक पोलीसांचे, प्रादेशिक परिवहन विभागाचे याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने देखील याकडे लक्ष न देणे, परिणामी कल्याण शहरातील नागरिकांचा शासना प्रति निर्माण झालेला तीव्र असंतोष, कल्याण शहराला वाहतुकीतून मुक्त करण्याच्या अनुषंगाने शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया"

## निवेदन

## (ॲड. अनिल परब, मा.मंत्री (परिवहन))

कल्याण व भिवंडी महानगरपालिका क्षेत्र हे MMR क्षेत्रामध्ये येत असून MMR क्षेत्रामधील प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांचेकडून एकूण १५,८५३ बसेसना कंत्राटी परवाने जारी करण्यात आले आहेत. तथापि, अवैधरित्या

शेटन/पुष्प १८३ ८ ८००-६-२०२२J-१

प्रवासी वाहतूक करणा-या बसेस व बस व्यतिरिक्त इतर प्रवासी वाहतूक करणा-या वाहनांवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| | तपासलेली वाहने | दोषी वाहने | वसुल केलेला कर (रु.) | वसुल केलेला दंड (रु.) |
|---|---|---|---|---|
| ठाणे | ६,९४४ | ७५५ | ७६,६५,००० | ११,०४,००० |
| कल्याण | ५२१ | १३० | १६,१५,३१२ | ६,४४,६०० |
| एकूण | ७,४६५ | ८८५ | ९२,८०,३१२ | १७,४८,६०० |

तसेच या विभागाच्या वायुवेग पथकामार्फत बसेस व इतर वाहनांची नियमितपणे तपासणी करण्यात येते व दोषी आढळलेल्या वाहनांवर मोटार वाहन अधिनियमानुसार कारवाई करण्यात येते. त्यानुसार माहे एप्रिल २०२१ ते फेब्रवारी २०२२ या कालावधीत अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणा-या बस व बस व्यतिरिक्त इतर प्रवासी वाहतूक करणा-या एकूण ८८५ दोषी वाहनांवर कारवाई करण्यात येऊन रु. ९२,८०,३१२/- इतक्या रकमेचा कर व रु. १७,४८,६००/- इतक्या रकमेचा दंड वसूल करण्यात आला आहे.

कल्याण रेल्वे स्टेशन हे मध्य रेल्वेचे अतिव्यस्त जंक्शन आहे. कल्याण स्टेशन पासून नाशिक मार्गे उत्तर भारतात दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, छत्तीसगड साठी तसेच पुणे-कर्जत मार्गे दक्षिण भारतात रेल्वेची प्रवासी व माल वाहतूक होत असते. कल्याण स्टेशन परिसराचा विस्तार झालेला असून स्टेशनपासून मात्र ७०० मीटर अंतरावर एस.टी. महामंडळाचा एस.टी. डेपो आहे. सदर डेपोतून पुणे, कोल्हापूर, नगर, नाशिक, जळगांव, धुळे, औरंगाबाद या जिल्हयाकरिता तसेच गुजरात राज्यासाठी बसेसची प्रवासी वाहतूक होत असते. कल्याण, भिवंडी, पनवेल, रायगड या भागात के.डी.एम.सी. व एन.एम.एम.टी. प्रवासी बस सेवा सुरु आहे. कल्याण शहरात गणेश घाट, वसंत व्हॅली येथे के.डी.एम.टी. बस डेपो आहे. कल्याण स्टेशन/एस.टी. स्टॅंड लगतच भाजी मंडई, बाजारपेठ, घाऊक धान्य बाजार, के.डी.एम.सी. चे रुक्मीणीबाई हॉस्पीटल, तहसिल कार्यालय तसेच मा. सत्र न्यायालय व मा. प्रथम वर्ग न्यायालये आहेत. याच बरोबर परिसरात फेरीवाले, फळ विक्रेते यांची दुकाने असल्याने सकाळी व सायंकाळी काही प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. या संदर्भात वाहतूक पोलीस व महानगरपालिका यांच्याकडून उपाययोजना केली जाते.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, भिवंडी-कल्याण शीळ रोडवरील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी एम.एस.आर.डी.सी, कल्याण डोंबिवली महानगर पालिका, स्मार्ट सिटीचे अधिकारी तसेच वाहतूक शाखा, कल्याण व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,

पृष्ठ १२३-१३५

कल्याण यांची एकत्रित समिती गठीत करण्यात आलेली आहे. कल्याण-भिवंडी मार्गावरील दुर्गाडी किल्ल्याजवळील पुलाचे काम पूर्ण झालेले असून पुलापुढील रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रीटीकरण करण्यात आल्यामुळे दोन्ही बाजूची वाहतूक सुरळीत होऊन वाहनांची वाहतूक कोंडी कमी झालेली आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या दिनांक ३०.०३.२०२२ च्या पत्रानुसार, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील दुर्घटनेच्या घटनेवर पोहचणे कामी अग्नीशमन केंद्राच्या वाहनास वाहतूक कोंडीचा फारसा अडथळा होत नाही. तसेच वाहतूक कोंडीमध्ये नागरिक तसेच वाहतूक पोलीस यांच्या मदतीने अग्निशमन वाहन वर्दीवर पोहचणेकरिता रस्ता मोकळा करण्यात येतो. सद्यस्थितीत कल्याण डोंबीवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये कल्याण पूर्व व पश्चिम तसेच डोंबिवली पूर्व व पश्चिम येथे प्रत्येकी एक व टिटवाळा येथे एक अशी एकूण ०५ अग्निशमन केंद्रे कार्यान्वित असून सदरची अग्निशमन केंद्रे प्रत्येकी १० कि.मी. च्या परिसरामध्ये उपलब्ध आहेत. शहराचे वाढते नागरीकीकरण लक्षात घेऊन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत आवश्यकतेनुसार जादा अग्निशमन केंद्र बांधण्याचे प्रस्तावित आहे.

*****

पृष्ठ १८३-२.

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
लक्षवेधी सुचना क्र. ८१५

**श्रीम. श्वेता महाले, विधानसभा सदस्या यांनी म.वि.स नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ८१५ पुढीलप्रमाणे आहे.**

"बुलढाणा जिल्ह्यात वरिष्ठ भुवैज्ञानिक व विकास यंत्रणा, बुलढाणा यांनी मनरेगा व इतर शासकीय योजनेतून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या वैयक्तिक विहिरींचे उद्दिष्टे न देणे, सन 2014 पासून जिल्ह्यात एकाही विहिरीला मान्यता न मिळणे, उद्दिष्टे निश्चित न केल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणावर विहिरींच्या लाभापासून वंचित राहणे, वरीष्ठ भु वैज्ञानिक बुलडाणा हे गेल्या 3-4 वर्षापासून विहिरींचे लक्षांक देण्यास टाळाटाळ करीत असणे, करीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सिंचन मान्यता देण्यासाठी वरिष्ठ भु वैज्ञानिक बुलडाणा यांना चिखली विधानसभा मतदारसंघातील चिखली आणि बुलढाणा तालुक्यातील सर्व गावांमधील सिंचन विहिरीचे लक्षांक देण्याबाबत आणि नवीन सिंचन विहिरींना लक्षांक निहाय मान्यता देण्याबाबत जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्याकडे वारंवार मागणी करणे, परंतु अद्यापही लक्षांक न मिळणे, तसेच दोन विहिरींच्या मध्ये 500 फुटाच्या आतील असलेल्या विहिरींना मान्यता येऊ नये ही अट रद्द करणे, यामुळे ज्या शेतकऱ्याने अद्यापपर्यंत विहीर खोदलेली नाही त्यांच्यावर अन्यायकारक असणे, वैयक्तीक सिंचन लाभार्थी यांचे करिता शासनाचे विविध योजने अंतर्गत (मग्रारोहयो, डॉ. बाबसाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना व इतर) सिंचनाचे विहिरी मंजूर करतांना पाणलोट क्षेत्र निहाय होणाऱ्या विहिरीच्या अनुषंगाने संचालनालय, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पूणे, यांनी दिलेल्या सूचनेनुसार सिंचन विहिरीची शिफारस करण्यात येणे, करण्यात येणाऱ्या मूल्यांकनामध्ये भूजलाचे उपशाचीटक्केवारी नुसार जिल्हयातील पाणलोट क्षेत्रांची चार 04 वर्गवारी मध्ये विभागणी करण्यात येणे, अतिशोषित पाणलोट क्षेत्र (Over Exploited 100 टक्केपेक्षा जास्त भूजल उपसा), शोषित पाणलोट क्षेत्र (Critical-90 से 100 टक्के), अंशतः शोषित पाणलोट क्षेत्र (Sernicritical- 70 ते 90 टक्के), सूरक्षित पाणलोट क्षेत्र (Safe-70 टक्केपेक्षा कमी भूजल उपसा), अतिशोषित व शोषित हया पाणलोट क्षेत्रामध्ये 90 टक्केपेक्षा जास्त उपसा झालेला असल्याने येथे कोणत्याही प्रकारच्या नवीन सिंचन विहिरी घेण्याबाबत पूर्णतः बंदी असणे, याचे कारण जमिनीतील पाण्याचा उपसा केल्या जातो असे कारण सांगणे, वस्तुतः ज्या ठिकाणी विहीर असेल त्या ठिकाणी पावसाचे पडलेले पाणी विहीर जितकी खोल असेल तिथपर्यंत जलसंधारण होत असणे, त्यामुळे शेतीला पावसाचे जमा झालेल्या पाण्यावर किमान कमी पाण्याची पिके घेता येणे तसेच जमिनीत काही प्रमाणात पाणी ही मुरणे, परंतु शासनाकडून जमिनीत पाणी मुरविण्याचे प्रयत्न न करताही केवळ उपसा होतो हे कारण दाखवून अतिशोषित व शोषित पाणलोट क्षेत्रात विहिरींचे उद्दिष्ट न देणे अन्यायकारक असणे. तसेच पूर्वी अंशत शोषित पाणलोट क्षेत्रामध्ये भूजलाचा उपसा हा 70 ते 90 टक्के पर्यंत असल्याने तेथे भूवैज्ञानिकांनी केलेल्या सर्वेक्षणाचे आधारे व भूजल पर्नभरणाचे अटींचे अधिन राहून या पूर्वी सिंचन विहिरींची शिफारस करण्यात येणे, परंतू आता संचालनालय, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांनी वैयक्तीक सिंचन विहिरी तसेच सामूदायिक लाभाच्या विहिरींबाबत नव्याने मार्गदर्शक सूचनेनुसार अंशत शोषित (Semicritical-70 ते 90 टक्के) पाणलोट क्षेत्रामधील गावांमध्ये नवीन सिंचन विहिरींची शिफारस करण्यात येऊ नये असे नमूद केल्याने अशतः पाणलोट क्षेत्रात विहिरींची शिफारस करता न येणे, बुलडाणा जिल्हयामध्ये एकूण 57 पाणलोट क्षेत्र असून यापैकी अंशतः शोषित पाणलोट क्षेत्र (Semicritical-70 ते 90 टक्के) या वर्गवारीमध्ये जिल्हयातील 24 पाणलोट क्षेत्रे समाविष्ट आहेत. यामुळे अंदाजे 50 टक्के जिल्हा हा शासनाचे विविध योजने अंतर्गत देय असलेल्या सिंचन विहिरीपासून

वंचीत राहणार असणे, (Semicritical-70 ते 90 टक्के) पाणलोट क्षेत्रामध्ये सिंचन विहिरींना बंदी घातल्याने अशा पाणलोट क्षेत्रामध्ये अतिरिक्त 20 टक्के भूजलसाठा असूनही नवीन सिंचन विहिरी घेण्यापासून अनेक लाभार्थी वचीत राहणार असणे, करिता या पूर्वी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने अंशत: शोषित (Semcritical-70 ते 90 टक्के) पाणलोट क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण करून व भूजल पर्नभरणाचे अटी व शर्वीचे अधिन राहून नव्याने देय असलेल्या सिंचन विहिरी बाबत घेतलेली भूमिका व अंमलात आणलेले धोरण पुनश्च अमलात आणून अंशत: शोषित (Semicritical-70 ते 90 टक्के) पाणलोट क्षेत्रामध्ये नवीन सिंचन विहिरीची शिफारस करण्यात यावी अशी होणारी मागणी याकडे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे पसरणारा तीव्र असंतोष, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

---

**श्री. गुलाबराव पाटील, मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे निवेदन**

केंद्रीय भूजल मंडळाने तयार केलेल्या भूजल अंदाज समिती २०१५ च्या कार्यप्रणालीनुसार राज्य शासनाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा व केंद्रीय भूजल मंडळ यांच्या सहकार्याने संयुक्तपणे केलेल्या सर्वेक्षणानुसार भूजल मुल्यांकनाची कार्यवाही करण्यात येते. यापुर्वी भूजल मुल्यांकन सन २०१६-१७, सन २०१९-२०२० करण्यात आले असून त्यास केंद्र शासनाची मंजुरी मिळाली आहे. भूजल मुल्यांकन सन २०२२ प्रस्तावित आहे.

जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, बुलढाणा यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व इतर शासकीय योजनेतून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या वैयक्तिक विहिरींच्या अनुषंगाने संबंधित यंत्रणाना वेळोवेळी लक्षांक देऊन मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

पंतप्रधान कृषी सिंचन योजना- हर खेत को पाणी" या केंद्र शासनाच्या योजनेच्या निकषानुसार सुरक्षित क्षेत्रातील ज्या पाणलोटाच्या विकासांची स्थिती ६० टक्के किंवा त्यापेक्षा कमी आहे, त्या क्षेत्रातच नवीन सिंचन विहिरीचा लाभ देण्यात येतो. सदर योजनेच्या निकषाचा अवलंब इतर शासकीय योजनांसाठी (मग्रारोहयो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना व इतर) करण्यात येत आहे. त्यामुळे अंशत: शोषित पाणलोट क्षेत्रात भूवैज्ञानिकांच्या सर्वेक्षणाच्या आधारे व भूजल पूनर्भरणाच्या अटीस अधीन राहून सिंचन विहिरींसाठी शिफारस करता येत नाही.

भूजल अंदाज समिती २०१५ च्या सन २०१९-२०२० च्या भूजल मुल्यांकनानुसार बुलढाणा जिल्ह्यात ०३ अतिशोषित पाणलोट क्षेत्र, ०१ शोषित पाणलोट क्षेत्र, २६ अंशत:शोषित पाणलोट क्षेत्र व २७ सुरक्षित पाणलोट क्षेत्र असे एकूण ५७ पाणलोट क्षेत्र आहेत.

अल्प भूधारक शेतकऱ्यांच्या सोयीच्या दृष्टीने सुरक्षित क्षेत्रातील ज्या पाणलोटाच्या विकासाची स्थिती ६० टक्के ते ७० टक्के आहे तेथे वैयक्तिक/सामुहिक लाभांच्या विहिरी काही अटींच्या अधीन राहून अनुज्ञेय करण्याबाबतच्या सूचना भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या दि. २९.०६.२०२१ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

दोन सिंचन विहिरीमधील अंतर १५० मी. (५०० फूट) असणे बाबतचे निकष नाबार्डमार्फत तांत्रिक आणि आर्थिक बाबींच्या आधारे ठरविण्यात आलेले असून तीच अट शासकीय योजनांमध्ये अन्य विभागाच्या शासन निर्णयाद्वारे व त्यांच्या अखत्यारीतील क्षेत्रीय यंत्रणांच्या आदेश/परिपत्रकाद्वारे लागू करण्यात आली आहे. दोन विहिरीमधील अंतर १५० मी. (५०० फूट) पेक्षा कमी केल्याने जलधरामधील भूजल विभागले जावून प्रती विहिर भूजल उपलब्धता कमी होते. पर्यायाने प्रती विहिर सिंचन क्षेत्र कमी होते, असे तांत्रिक मत आहे.

*********************************

सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

## महाराष्ट्र विधानसभा लक्षवेधी सूचना क्र.८९

### सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री राम कदम, रवि राणा व अभिमन्यु पवार वि.स.स. यांनी म.वि.स. १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ८९ पुढीलप्रमाणे आहे :-

---

" राज्यातील खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी प्रवेशाच्या सर्व फे-या संपल्यानंतर महाविद्यालयामध्ये रिक्त असणाऱ्या जागांवर प्रवेश घेतल्यास त्यांना शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ नाकारण्यात येत असणे, शेवटची प्रवेश फेरी ही नियमित प्रवेश प्रक्रियेचाच एक भाग असताना या फेरीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचा लाभ नाकारून तंत्रशिक्षण संचालनालयाकडून मागास समाजातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, शिष्यवृत्तीसाठी पात्र असूनही संस्था स्तरावरील फेरीमध्ये प्रवेश घेणाऱ्या हजारो गुणवंत विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्क दयावे लागत असल्याने सरकारच्या या धोरणाला विद्यार्थ्यांमधून विरोध होत असणे, शेवटच्या फेरीमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती व शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ मिळावा यासाठी विद्यार्थी आग्रही असून याबाबत शासनाला या विषयाची तात्काळ दखल घेण्याची विनंती केलली असणे, राज्य सरकारच्या या अन्यायकारक धोरणामुळे अनेक मागास प्रवर्ग गटातील विद्यार्थ्यांचे नुकसान होत असणे, संस्था स्तरावर होणाऱ्या प्रवेश फेरीमधील विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती व शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ लागू करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना".

---

### मा.श्री.धनंजय मुंडे, मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य यांचे निवेदन

राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता मॅट्रीकोत्तर उच्च शिक्षण घेता येण्याकरीता राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांमार्फत विविध शिष्यवृत्ती योजना राबविण्यांत येतात. यामध्ये प्रामुख्याने केंद्र शासन पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना तसेच राज्य शासनाची शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतीपूर्ती योजना या दोन योजनांचा समावेश आहे. यामध्ये केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केंद्र पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत खाजगी विनाअनुदानीत व कायम विना अनुदानित महाविद्यालयांतील अभ्यासक्रमांमध्ये केंद्रभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे सर्व फे-यांमध्ये प्रवेशित असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ दिला जात आहे.

२. त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या उच्च व तंत्र विभागामार्फत अर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येणारी शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनादेखील राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील व्यवसायिक अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता राबविण्यांत येत आहे.

२.१ सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यांत येणारी शिक्षण शुल्क परिक्षा शुल्क योजना राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत अर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता राबविण्यांत येणा-या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत वेळोवेळी निर्गमित केलेल्या निकषांनुसार राबविली जात आहे (Parent Department). सदर योजनेच्या शासन निर्णय दिनांक ३१ मार्च, २०१६ मधील निकषानुसार राज्यातील खाजगी विनाअनुदानीत व कायम विना अनुदानित महाविद्यालयांतील निवडक व्यवसायिक अभ्यासक्रमात प्रवेशित असलेले अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांने उच्च व तंत्र विभागांतर्गत राबविण्यांत येणा-या केंद्रभूत प्रवेश प्रक्रियेव्दारेच (Cap Round) प्रवेश घेणे बंधनकारक आहे. सदर केंद्रभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच्या महाविद्यालय स्तरावरील प्रवेश प्रक्रीया अथवा स्पॉट ॲडमिशन तसेच अगेन्स्ट कंप इत्यादी फेरीमधून प्रवेशित अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदरील योजना शासन नियमानुसार अनुज्ञेय नाही.

---